**स्थायी निदेश क्र.३४**

नगरपरिषदेच्या विकास कामाकरीता तांत्रिक
ज्ञान असलेले अधिकाऱ्यांनी अंकीत
नगरपरिषदांचे करावयाचे पर्यवेक्षणाबाबत.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
क्र.नपप्रसं/विकास कामे/२००५/प्र.क्र.२९२/३२
दिनांक : २८ नोव्हेंबर, २००५

**प्रस्तावना :**

१. ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे नगरपरिषदांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे. घटना दुरुस्तीनुसार १८ विषय नगरपरिषदांकडे सोपविल्याने व वाढत्या नागरीकीकरणामुळे नागरी सुविधा निर्माण करण्याची व विकास कामांची अंमलबजावणी करण्याची नगरपरिषदांची जबाबदारी वाढली आहे.

२. नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी व विकास कामांची अंमलबजावणीसाठी राज्य शासनाशिवाय केंद्र शासनाकडून सुध्दा नगरपरिषदांना निधी प्राप्त होत आहे. नगरपरिषदांना निधी उपलब्ध असून देखील कार्यक्षम यंत्रणा नसल्याने विकास कामांच्या अंमलबजावणीमध्ये अडचणी निर्माण होत आहेत. विकास कामाचे अंमलबजावणीकरिता तांत्रिक ज्ञान असलेला सर्वसाधारणपणे बांधकाम, पाणीपुरवठा व जलनि:स्सारण, विद्युत व्यवस्था, नगररचना, घनकचरा व्यवस्थापन, अग्निशमन व्यवस्था, लेख्यांची रचना, संगणकीकरण या विषयांसाठी तांत्रिक अधिकारी वर्ग नगरपरिषदेच्या आस्थापनेवर असणे आवश्यक आहे. नगरपरिषदांना आधुनिक तंत्रज्ञान असलेले अधिकारी उपलब्ध झाल्यास त्यांच्या कामकाजात गुणात्मक वाढ होऊ शकते.

३. राज्यातील अ वर्ग नगरपरिषदा व बऱ्याच ब वर्ग नगरपरिषदेचे आस्थापनेवर तांत्रिक कर्मचारी कार्यरत आहेत. तथापि क वर्ग नगरपरिषदेचे आस्थापनेवर वरिष्ठ तांत्रिक अधिकारी नाहीत. राज्यातील क वर्ग नगरपरिषदांची आर्थिक स्थिती विचारात घेता नवीन तांत्रिक कर्मचारीवर्ग नियुक्त करुन नगरपरिषदेवर खर्चाचा बोजा वाढविणे योग्य होणार नाही. नवीन तंत्रज्ञानाचा वापर केल्याने नगरपरिषदेची कार्यक्षमता व कामाच्या गुणवत्तेमध्यें वाढ शक्य होणार असल्याने आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या नगरपरिषदांना अशा लाभापासून वंचित ठेवणे योग्य होणार नाही.

४. सध्या कार्यरत असलेल्या नगरपरिषद तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या ज्ञानाचा फायदा इतर नगरपरिषदांना करुन देणे शक्य आहे. त्यासाठी पर्यवेक्षीय नगरपरिषदांची यंत्रणा विहित करण्याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यांत येत आहेत.

**आ दे श**

१. सोबतच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे सर्व अ व ब वर्ग नगरपरिषदा आणि १६ क वर्ग नगरपरिषदा यांना पर्यवेक्षीय नगरपरिषदा नेमण्यांत येत आहे.

२. पर्यवेक्षीय नगरपरिषदांमधील तात्रिक अधिकारी त्यांच्या अंकीत असलेल्या क वर्ग नगरपरिषदांना व नगरपंचायतीं मुख्याधिका-याना संबधित विभागाची कामाची गुणवत्ता सुधारण्यासाठी तंत्रिक बाबींवर मार्गदर्शन करतील.

३. पर्यवेक्षीय नगरपरिषदेतील तांत्रिक अधिकाऱ्यांची कर्तव्ये व अधिकार खालीलप्रमाणे असतील.

अ) **स्थापत्य शास्त्र :**

१. बांधकाम पर्यवेक्षकांनी तयार केलेले नकाशे व आराखडे मंजूरीसाठी सादर करण्यापूर्वी संबंधित अधिनियम/नियम यातील तरतुदी विचारात घेऊन छाननी करणे व त्यात आवश्यक्तेनुसार सुधारण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांना आपले अभिप्राय देणे.

२. निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक मुद्यावर शिफारस करणे.

३. बांधकाम पर्यवेक्षकांनी मोजणी पुस्तकात केलेल्या नोंदी, निरीक्षण अहवालातील नोंदी, देयकाची व स्थळ निश्चित करुन कामाच्या दर्जाची तपासणी करणे.

४. सार्वजनिक रस्ते, गटारे, इमारत बांधकाम इत्यादी बाबत नगरपरिषद कामकाजात स्थापत्य शास्त्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल याचे नगरपरिषद कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे.

५. नगरपरिषदांच्या विकास कामांचा दर्जा उंचावण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करणे.

६. अंकीत नगरपरिषदांना गरजेनुसार तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन देणे.

**ब) पाणीपुरवठा व जलनिःसारण :**

१. पाणीपुरवठा व जलनि:सारण पर्यवेक्षकांनी तयार केलेले नकाशे व आराखडे मंजूरीसाठी सादर करण्यापूर्वी संबंधित अधिनियम/नियम यातील तरतुदी विचारात घेऊन छाननी करणे व त्यात आवश्यक्तेनुसार सुधारण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांना आपले अभिप्राय देणे.

२. निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक मुद्यावर शिफारस करणे.

३. पाणीपुरवठा व जलनि:सारण पर्यवेक्षकांनी मोजणी पुस्तकात केलेल्या नोंदी, निरीक्षण अहवालातील नोंदी, देयकाची व स्थळ निश्चित करुन कामाच्या दर्जाची तपासणी करणे.

४. शहरातील सर्व भागांना पुरेसे व योग्य पाण्याचा पुरवठा होतो याची तपासणी करणे.

५. पाणीपुरवठा व मलनि:स्सारण योजनेची देखभाल, दुरुस्ती व विस्तार याबाबत मार्गदर्शन करणे.

६. नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजना अधिक कार्यक्षम व स्वयंनिर्वाही (Self Sustain) करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणेसाठी मार्गदर्शन करणे.

७. पाणीपुरवठा योजनेचे पाणी लेखापरिक्षण व उर्जा लेखापरिक्षण करुन बचतीची उपाय योजना करणे संदर्भात मार्गदर्शन करणे.

८. उघडया गटाराचे बंदिस्त गटारमध्ये रुपांतर करण्याबाबत मार्गदर्शन करणे.

९. सार्वजनिक मुताऱ्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत मार्गदर्शन करणे.

**क) विद्युत व्यवस्था :**

१. विद्युत पर्यवेक्षकांनी तयार केलेले नकाशे व आराखडे मंजूरीसाठी सादर करण्यापूर्वी संबंधित अधिनियम/नियम यातील तरतुदी विचारात घेऊन छाननी करणे व त्यात आवश्यक्तेनुसार सुधारण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांना आपले अभिप्राय देणे.

२. निविदा प्रक्रियेमध्ये तांत्रिक मुद्यावर शिफारस करणे.

३. विद्युत पर्यवेक्षकांनी मोजणी पुस्तकात केलेल्या नोंदी, निरीक्षण अहवालातील नोंदी, देयकाची व स्थळ निश्चित करुन कामाच्या दर्जाची तपासणी करणे.

४. सार्वजनिक विद्युत व्यवस्था, देखभाल व दुरुस्तीबाबत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याचे मार्गदर्शन करणे.

५. सार्वजनिक विद्युतव्यवस्थेकरिता टाईमरचा, उर्जा लेखापरिक्षण इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याचे मार्गदर्शन करणे.

**ड) घनकचरा व्यवस्थापन :**

१. घनकचरा व्यवस्थापन उपविधीच्या व्यवस्थापनाची अंमलबजावणी करणे संदर्भात मार्गदर्शन करणे.

२. मोठया घनकचरा उत्पादकाकडून स्वतंत्र संकलन व्यवस्थेसाठी कार्यवाही करणे संदर्भात मार्गदर्शन करणे.

३. डेब्रिजसाठी स्वतंत्र संकलन व्यवस्थेची कार्यवाही करणे संदर्भात मार्गदर्शन करणे.

४. घरोघरी कचरा संकलन वाढविण्यासाठी तसेच वर्गीकरण करणे संदर्भात मार्गदर्शन करणे.

५. कचरा वाहतुकीसाठी (बंदिस्त/वर्गीकृत कचऱ्यासाठी स्वतंत्र वाहतूक/वारंवार हाताळणी टाळण्यासाठी उपाययोजना) करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करणे.

६. घनकच-यावर प्रक्रियेसाठी (गांडूळखतनिर्मिती/ कंपोस्टखतनिर्मिती/ बायोगॅस निर्मिती/ उर्जानिर्मिती इ.) कार्यवाहीसाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करणे.

७. घनकचरा भूमिभरावासाठी पुरेशी जमीन उपलब्ध करुन विकास करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

८. जैव वैद्यकीय घनकचरा नियमातील तरतुदीन्वये जैव वैद्यकीय घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याबाबत मार्गदर्शन करणे.

९. नगरपरिषद पर्यावरण सुधारण्यासाठी मार्गदर्शन करणे

इ) अग्निशमन व्यवस्था :

१. आधुनिक तत्रज्ञानाच्या व तज्ञ अधिकाऱ्यांच्या सहाय्याने कमीत कमी कर्मचाऱ्यांकडून कार्यक्षम अग्निशमन व्यवस्था कार्यान्वित करणे संदर्भात मार्गदर्शन करणे.

२. अग्निशमन यंत्रणा कार्यक्षम राहण्यासाठी उपकरणांचे परिक्षण करणे, कर्मचा-यांचे प्रशिक्षण घेणे .

३. आगीच्या वर्दीनुसार तात्काळ करावयाच्या कार्यवाही संदर्भात मार्गदर्शन करणे.

४. अग्निशमन यंत्रणा नगरपरिषद क्षेत्रात कमी वेळेत पोहोचू शकेल याबाबत, आग प्रतिबंधक उपाययोजनाबाबत,व आपत्कालीन व्यवस्थापन संदर्भात आराखडा तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

५. अग्निशमन शुल्क लावण्याबाबत कार्यवाही करणे संदर्भात मार्गदर्शन करणे.

ई) लेख्यांची रचना :

१. पर्यवेक्षीय लेखाधिकारी यांनी कार्यक्षेत्रातील नगरपरिषद लेख्यांची नियमित तपासणी करणे व लेखे सुव्यवस्थीत ठेवले आहेत किंवा नाहीत याची शहानिशा करणे .

२. द्विनोंद लेखा पध्दतीची अंमलबजावणी करणेसाठी मार्गदर्शन करणे.

३. लेखा आक्षेपांची पूर्तता करण्याबाबत पाठपुरावा कसा करावा याचे मार्गदर्शन करणे.

४. अंतर्गत लेखापरिक्षण करुन अहवाल देणे .

५. नगरपरिषदेच्या वितीय शिस्तीसाठी मार्गदर्शन करणे.

६. नगरपरिषद निधीच्या गुंतवणुकीसाठी मार्गदर्शन करणे.

प) संगणकीकरण :

१. नगरपरिषदेच्या कामकाजाचे संपूर्ण संगणकीकरण करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

२. संगणकीकरण झालेल्या व्यवस्थेची नियमित तपासणी करणे व संगणकीकरण व्यवस्था अद्यावत करणेसाठी मार्गदर्शन करणे.

३. संगणकाची आज्ञावली वापराबाबत कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे.

४. संगणकाचे हार्डवेअर देखभाल दुरुस्तीसाठी Facility Manager नेमणेबाबत मार्गदर्शन करणे.

५. इंटरनेट कनेक्टीव्हीटी व वेब साईट तयार करणेबाबत मार्गदर्शन करणे.

फ) नगररचना (बांधकाम परवानगी) :

१. बांधकाम परवानगी/भूखंड रेखांकन परवानगी देतांना नियम/उपविधी यांतील विचारात घ्यावयाच्या तरतूदींचेमार्गदर्शन करणे.

२. बांधकाम परवाना जेष्ठता यादीनुसार दिले जात आहे काय याची तपासणी करणे.

३. बांधकाम परवाना देताना योग्य विकास शुल्क आकरण्यात आले आहे काय याची तपासणी करणे.

४. बांधकाम परवाना / बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र बरोबर देण्यात आले आहे किंवा नाही याची तपासणी करणे.

५. बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्र दिल्यानंतर कर अकारणी केली जात आहे याची तपासणी करणे.

६. अतिक्रमणे / अनियमित बांधकामे काढण्यासाठी मार्गदर्शन करणे.

७. गुंठेवारी पध्दतीची अंमलबजावणी करणे.

ग) नगर रचना (शहर विकास ):

१. मंजूर विकास आराखडयानुसार विकास प्रकल्प हाती घेऊन ते पूर्ण करणे संदर्भात अधिनियम/नियम यातील संबंधित तरतूदींची माहिती देणे.

२. मंजूर विकास आराखडयामध्ये सुधाणरणेंबाबत शिफारस करणे.

३. विकास आराखडयानुसार भुसंपादन ,शासकीय जमीन हस्तांतरणबाबत मार्गदर्शन करणे.

४. नागरी पुनरुस्थापन अभियान (URBAN RENEWAL MISSION) बाबत मार्गदर्शन करणे.

५. बीओटी /खाजगी,सार्वजनिक सहयोगातून शहरविकास प्रकल्पाबाबत मार्गदर्शन करणे.

५. उपरोक्त नमूद केलेली कर्तव्ये पार पाडणे पर्यवेक्षीय नगरपरिषदांमधील तांत्रिक अधिकारी अंकीत नगरपरिषदांना दोन महिन्यातून किमान एकदा भेट देतील. अंकीत नगरपरिषद मुख्याधिका-याने मागणी केल्यास जादा भेटी देतील. तसेच विशिष्ट सभांना किंवा कामकाजाकरीता उपस्थित राहण्यास सुचविल्यास त्यावेळी उपस्थित राहतील.

६. नगरपरिषद तपासणी मध्ये कांही विशेष बार्बीवर पर्यवेक्षीय तांत्रिक अधिकाऱ्यांना अहवाल दयावयाचा झाल्यास तो नगरपरिषदेस देतील व त्याची प्रत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना सादर करतील. जिल्हाधिकाऱ्यांनी या विशेष अहवालाची दखल घेऊन आवश्यकतेनसार उचित कार्यवाही करण्याबाबत अशा नगरपरिषदांना आदेशित करतील .

७. पर्यवेक्षीय नगरपरिषदेची यंत्रणा ही जिल्हयाचा विचार करुन जिल्हयाच्या कार्यक्षेत्रामध्ये निर्माण केलेली असल्याने पर्यवेक्षीय नगरपरिषद व त्यांचे कार्यक्षेत्रातील नगरपरिषदांचे समन्वय करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्याची असेल.पर्यवेक्षीय नगरपरिषदेची यंत्रणा कार्यरत होत असतांना प्रशासकीय अडचणी आल्यास जिल्हा स्तरांवर अशा अडचणी दूर करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना असेल.

८. पर्यवेक्षीय नगरपरिषदेने तांत्रिक अधिकाऱ्यांच्या भेटीचे / पर्यवेक्षण शुल्क आकारणी बाबतचे आदेश स्वतंत्र रित्या निर्गमित करण्यांत येतील.

९. सोबतच्या परिशिष्टातील १६ क वर्ग पर्यवेक्षीय नगरपरिषदांच्या आस्थापनेवर वरिष्ठ पातळीचे तांत्रिक अधिकारी उपलब्ध नसल्यास पदनिर्मितीबाबत नगरपरिषदेने सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय घेऊन प्रस्ताव या संचालनालयास पाठविल्यास महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ७६ (१) नुसार मंजूरी देण्याबाबत विचार केला जाईल.

**१०. उपरोक्त आदेश शासन नगर विकास विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. नपप्रसं/विकास कामे/२००५/प्र.क्र.२९२/५/९(३२), दि. १८.७.२००५ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यांत येत आहे.**

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

परिशिष्ट

| जिल्हा | अ.क्र. | पर्यवेक्षीय नगरपरिषद | वर्ग | अंकीत नगरपरिषद |
|---|---|---|---|---|
| ठाणे | १ | वसई | ब | |
| | २ | विरार | अ | |
| | ३ | डहाणू | ब | जव्हार (क) |
| | ४ | नालासोपारा | अ | |
| | ५ | कुळगांव-बदलापूर | ब | |
| | ६ | अंबरनाथ | अ | |
| | ७ | नवघर-माणिकपूर | अ | |
| | ८ | पालघर | ब | |
| रायगड | ९ | पनवेल | अ | माथेरान (क) ,कर्जत (क) ,उरण (क) |
| | १० | खोपोली | ब | पेण (क) ,अलिबाग (क) |
| | ११ | महाड | क | रोहा (क), मुरुड-जंजिरा (क) , श्रीवर्धन (क) |
| रत्नागिरी | १२ | रत्नागिरी | ब | राजापूर (क) |
| | १३ | चिपळूण | ब | खेड (क) , दापोली (नगरपंचायत) |
| सिंधुदुर्ग | १४ | सावंतवाडी | क | मालवण (क) , वेंगुर्ले (क) , कणकवली (नगरपंचायत) |
| नाशिक | १५ | मनमाड | ब | नांदगांव (क) , सटाणा (क) |
| | १६ | सिन्नर | क | भगूर (क) , इगतपूरी (क) , त्र्यंबक (क) |
| | १७ | येवला | ब | |
| धुळे | १८ | शिरपूर वरवाडे | ब | |
| | १९ | दौंडाईचे वरवाडे | | |
| नंदूरबार | २० | नंदूरबार | ब | नवापूर (क) |
| | २१ | शहादा | ब | तळोदा (क) |
| जळगांव | २२ | भुसावळ | अ | फैजपूर (क) , यावल (क) , रावेर (क) , सावदा (क) , जामनेर (क) |
| | २३ | चोपडा | ब | |
| | २४ | अंमळनेर | ब | पारोळा (क) , धरणगाव (क) , एरंडोल (क) |
| | २५ | चाळीसगांव | ब | |
| | २६ | पाचोरा | ब | |
| अहमदनगर | २७ | श्रीरामपूर | ब | राहूरी (क), देवळाली प्रवरा (क), पाथर्डी (क) , श्रीगोंदा (क) |
| | २८ | संगमनेर | ब | |
| | २९ | कोपरगांव | ब | राहता पिंपळस (क) , शिर्डी (नगरपंचायत) |
| पुणे | ३० | बारामती | ब | भोर (क), जेजूरी (क) , इंदापूर (क) |
| | ३१ | लोणावळा | ब | |
| | ३२ | तळेगाव दाभाडे | ब | जुन्नर (क) , आळंदी (क) , शिरु र (क) |
| | ३३ | दौंड | ब | सासवड (क) , |
| सातारा | ३४ | सातारा | अ | वाई (क) , महाबळेश्वर, (क) ,पाचगणी (क) |
| | ३५ | कराड | ब | रहिमतपूर (क) |
| | ३६ | फलटण | ब | म्हसवड (क) |
| सांगली | ३७ | इस्लामपूर | ब | आष्टा (क) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३८ | विटा | ब | तासगांव (क) |
| सोलापूर | ३९ | बार्शी | अ | करमाळा (क), कुर्डुवाडी (क) |
| | ४० | पंढरपूर | ब | सांगोला (क), मंगळवेढा (क) |
| | ४१ | अक्कलकोट | क | मैंदर्गी (क), दुधनी (क) |
| कोल्हापूर | ४२ | इचलकरंजी | अ | वडगांव (क), पन्हाळा (क), मलकापूर (क) |
| | ४३ | जयसिंगपूर | ब | कुरुंदवाड (क) |
| | ४४ | कागल | क | गडहिंग्लज (क), मुरगुड (क) |
| औरगाबाद | ४५ | वैजापूर | क | पैठण (क), गंगापूर (क) |
| | ४६ | सिल्लोड | ब | कन्नड (क), खुलदाबाद (क) |
| जालना | ४७ | जालना | अ | अंबड (क), भोकरदन (क), परतूर (क) |
| परभणी | ४८ | परभणी | अ | जिंतूर (क), सेलू (क), पूर्णा (क) |
| | ४९ | गंगाखेड | ब | मानवत (क), सोनपेठ (क), पाथरी (क) |
| हिंगोली | ५० | हिगोली | ब | कळमनुरी (क) |
| | ५१ | बसमतनगर | ब | |
| बीड | ५२ | बीड | अ | गेवराई (क) |
| | ५३ | अंबेजोगाई | ब | धारुर (क) |
| | ५४ | परळी वैजनाथ | ब | |
| | ५५ | मांजलगांव | ब | |
| नांदेड | ५६ | कंधार | क | लोहा (क), मुखेड (क) |
| | ५७ | धर्माबाद | क | उमरी (क), मुदखेड (क) |
| | ५८ | देगलूर | क | बिलोली (क), कुंडलवाडी (क) |
| | ५९ | किनवट | क | हदगांव (क) |
| उस्मानाबाद | ६० | उस्मानाबाद | ब | तुळजापूर (क), परांडा (क), भूम (क), कळंब (क) |
| | ६१ | उमरगा | क | मुरुम (क) नळदुर्ग (क) |
| लातूर | ६२ | लातूर | अ | निलंगा (क) औसा (क) |
| | ६३ | उदगीर | ब | अहमदपूर (क) |
| बुलढाणा | ६४ | बुलढाणा | ब | |
| | ६५ | खामगाव | ब | नांदूरा (क) |
| | ६६ | मलकापूर | ब | |
| | ६७ | शेगाव | ब | जळगांव जामोद (क) |
| | ६८ | मेहकर | क | देऊळगांवराजा (क), लोणार (क), सिंदखेड राजा (क) |
| | ६९ | चिखली | ब | |
| यवतमाळ | ७० | यवतमाळ | अ | दिग्रस (क), दारव्हा (क), घाटंजी (क) |
| | ७१ | वणी | ब | पांढरकवडा (क) |
| | ७२ | पुसद | ब | उमरखेड (क) |
| अकोला | ७३ | अकोट | ब | तेल्हारा (क) |
| | ७४ | बाळापूर | क | मुर्तिजापूर (क), पातूर (क) |
| वाशिम | ७५ | वाशिम | ब | रिसोड (क) |
| | ७६ | कारंजा | ब | मंगरुळपीर (क) |
| अमरावती | ७७ | अचलपूर | अ | चिखलदरा (क), चांदूरबाजार (क) |
| | ७८ | अंजनगांवसुर्जी | ब | दर्यापूर (क) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ७९ | वरुड | ब | मोर्शी (क) ,शेदुरजनाघाट (क) |
| | ८० | धामणगांव | क | चांदूररेल्वे (क) |
| नागपूर | ८१ | कामठी | ब | रामटेक (क), खापा (क) |
| | ८२ | उमरेड | ब | |
| | ८३ | काटोल | क | कळमेश्वर (क) , मोवाड (क) , सावनेर (क), नरखेड (क) मोहपा (क) |
| भंडारा | ८४ | भंडारा | ब | पवनी (क) |
| | ८५ | तुमसर | ब | |
| गोंदिया | ८६ | गोंदिया | अ | तिरोरा (क) |
| वर्धा | ८७ | वर्धा | अ | पुलगांव (क) , देवळी (क) |
| | ८८ | आर्वी | ब | |
| | ८९ | हिंगणघाट | ब | सिंदी (क) |
| चंद्रपूर | ९० | चंद्रपूर | अ | मूल (क) |
| | ९१ | बल्लारपूर | ब | राजूरा (क) |
| | ९२ | भद्रावती | ब | |
| | ९३ | वरोरा | ब | |
| | ९४ | ब्रम्हपूरी | क | |
| गडचिरोली | ९५ | गडचिरोली | क | देसाईगंज (क) |